# ECHO OF HIS CALL

# बोलाविण्याचा प्रतिध्वनी

MARATHI

ECHO OF HIS CALL 1969-2019 GOLDEN JUBILEE REACHING NATIONS

*India's National Spiritual Newspaper* ₹ 10/-

Published monthly in ENGLISH, TAMIL, MALAYALAM, TELUGU, HINDI, KANNADA, MARATHI, BENGALI, GUJARATI, ODIYA, ASSAMESE, PUNJABI, NEPALI, URDU, SINHALA & AFRIKAN

Editor : S. SAM SELVA RAJ | 16 Languages | Associate Editor : Rev. SHASHI TIWARI

VOL: XXIV | JANUARY 2023 | No. 12


## पवित्र शास्त्र

**कृपया हा शास्त्र भाग पाठ करा**

मत्तय : ५:११-१८

११) जेव्हा माझ्यामुळे लोक तुमची निंदा व छळ करतील आणि तुम्हां विरुद्ध सर्व प्रकारचे वाईट लबाडीनें बोलतील तेव्हां तुम्ही धन्य.

१२) आनंद व उल्हास करा, कारण स्वर्गात तुमचे प्रतिफळ मोठे, तुम्हांपूर्वी जे संदेष्टे होऊन गेले त्यांचा त्यांनी तसाच छळ केला.

१३) तुम्ही पृथ्वीचें मीठ आहा; जर मिठाचा खारटपणाच गेला तर त्याला खारटपणा कशाने येईल? ते बाहेर टाकण्यांत येऊन माणसांच्या पायाखाली तुडविले जावे याशिवाय कोणत्याहि उपयोगाचें नाही.

१४) तुम्ही जगाचा प्रकाश आहा; डोंगरावर वसलेले नगर लपत नाही.

१५) दिवा लावून मापारवाली ठेवीत नाहीत, दिवठणीवर ठेवितात; म्हणजे तो घरांतील सर्वांवर उजेड पाडितो.

१६) त्याप्रमाणें तुमचा उजेड लोकांपुढे पडो, यासाठी की त्यांनी तुमची चांगली कामे पाहावी आणि तुमच्या स्वर्गातील पित्याचे गौरव करावे.

१७) नियमशास्त्र व संदेष्ट्यांचें ग्रंथ ही रद्द करावयास मी आलो असे समजू नका; रद्द करावयास नाही, तर पूर्ण करावयास आलो आहे.

१८) मी तुम्हांस खचीत सांगतो, आकाश व पृथ्वी नाहीतशी होतपर्यंत सर्व गोष्टी पूर्ण झाल्यावाचून नियम शास्त्राची एक मात्रा किंवा एक बिंदु नाहीसा होणार नाही.''

# आशीर्वादीत नूतन वर्ष...

## २०२३

**डॉ. ए. रिचर्ड सॅम्युएल**

**''सर्व प्रकारचें कटुत्व, संताप, क्रोध, कलकलाट व अभद्र भाषण ही, अवघ्या दुष्टपणासुद्धां तुम्हांपासून दूर करण्यांत येवोत; आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारिक व कनवाळू व्हा; जशी देवानें ख्रिस्तामध्ये तुम्हाला क्षमा केली आहे तशी तुम्हीहि एकमेकांना क्षमा करा.'' (इफिस ४:३१-३२).**

आपण नवीन वर्षात पदार्पण करीतो तेव्हा नवीन वर्षाकरीता नवीन निश्चय करीत असतो. परंतु खेदाची गोष्ट अशी, की आपण मागील वर्षी कोणते निश्चय केले होते आणि त्यापैकी किती पूर्ण केले हे आठविण्याचा प्रयत्न देखील करीत नाही. कोणीतरी विनोदाने असे म्हटले आहे, ''नवीन वर्षी केलेले निश्चय हे मोडण्याकरिता केले जातात.''

नवीन वर्षाचे निश्चय हे सजीव ठेवावयाचे असतील, तर ते सांघीक असले पाहिजे (Tem Work) येशू ख्रिस्ताने प्रशीक्षित केलेले शिष्य, तो वध:स्तंभावर खिळीला गेल्या बरोबर त्याला सोडून गेले. त्याच्या पुरुत्थानानंतर त्याने त्यांना गालीलच्या पर्वतावर एकत्रीत होण्यास सांगितले होते. (मत्तय २८:१६). त्यांनी आज्ञापालन केले; परंतु विलंब लागल्यामुळे ते त्यांच्या मूळच्या व्यवसायाकडे परतले. (योहान २१:१-४). प्रे.कृ. अध्याय दोन मध्ये आपण वाचतो कि, पेंन्टेकॉस्टच्या (पन्नासाव्या) दिवशी पवित्र आत्म्यानें वरच्या माडीवर शिष्यांची भेट घेतली. त्यांना सामर्थ्य प्राप्त झाले आणि त्यांच्यात अभूतपूर्व असा बदल घडला. ते सुवार्तेचा प्रचार करणारे धीट प्रचारक झाले. आपण नवीन वर्षाच्या निश्चय करण्याचा विचार करीत असताना एक गोष्ट समजून घेतली पाहिजे, आपण देवाच्या मदतीशिवाय काहीहि करु शकत नाही, नवीन वर्षाकरिता केलेला निश्चय देखील. योहान १५:५. वचन

(...पान ३ वर)

## एको ऑफ हिज कॉल - यू ट्युब चॅनल!

*पास्टर सॅम सेल्वा राज सोबत प्रार्थना करा!!*



आमचे तामीळ भाषेतील संदेश आमच्या यू ट्युब चॅनल **एको ऑफ हिज कॉल** वरुन सोमवार ते शनिवार दररोज पहाटे ५ वाजता आणि दर रविवारी सकाळी ८.३० वाजता प्रसारीत करण्यात येत आहेत. इंग्रजी व हिन्दी भाषेमध्ये देखील लवकरच संदेश प्रसारीत करणार आहोत. तुम्ही दररोज **एको ऑफ हिज कॉलचे** प्रार्थना भागीदार या नात्याने पास्टर सॅम सेल्वा राज यांच्या सोबत वैयक्तिकरित्या प्रार्थना करु शकता. **- मेरी आणि क्रिस्टी चिन्निया, निर्देशको**

# ECHO OF HIS CALL - (1969-2019 GOLDEN JUBILEE YEAR)



## तुमच्या अतिप्रिय बंधु कडून...



### आमचे कार्याविषयीचे धोरण

आम्ही समकालीन पीढीला पुरातन आणि आरंभीच्या प्रेषितांची शिकवण तीची प्रखरता कमी न करता स्पष्ट करावी आणि शिकवावी ही काळाची गरज आहे.

**CHIEF EDITOR**
Angeline Selvakumari Henry, M.A., M.Ed.

**MANAGING EDITOR**
Pastor Alex Samson Sam, B.Th., M.Div.

**ADMINISTRATION**
Bro. N. Prakasam, M.A., General Manager

**EDITORIAL BOARD**
Sis. Jesy Veena Sam
Sis. Serena Bevin, M.A., M.Phil., B.Ed.
Dr. A. Richard Samuel, M.A., Ph.D.
Rev. Dr. K.R. Rajasekaran

**EDITOR, PUBLISHER & PRINTER**
Pastor S. SAM SELVA RAJ
Echo of His Call Printers
10, Mohammed Abdullah 2nd Street,
Chepauk, Chennai- 600 005, India.
Phone : (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766
Cell : (+91) 98410 71852, 95661 31858

**CORE LEADERS**
Bro. K. Puratchivendan
Bro. A. Edward Durai
Bro. A. Alvin
Bro. K. Abraham
Sis. Dhanalakshmi Chinnaiah

**E.mail ID**
sam@echoofhiscall.org
biblecor@yahoo.co.in

**WEBSITES**
www.echoofhiscall.org
www.stpaulsmatriculation.com

**YOUTUBE CHANNEL**
Echo of His Call

## "...तुझी आशा नष्ट होणार नाही."

(नीतिसूत्रे २३:१८)

प्रभु मधील प्रियांनो,

हे २०२३चे नूतन वर्ष, तुम्हां सर्वांना आपल्या प्रभु व तारणाऱ्या येशूच्या नामात सुखाचे जावो अशी शुभेच्छा व्यक्त करितो. मागील सर्व वर्षांत ज्या प्रभु देवाने आमचे मार्गदर्शन केले, आम्हाला चालविले, त्याला मान, महिमा आणि गौरव देत आहोत.

तुम्ही सर्वजण कसे आहात? आम्ही अंत:करणात अतीशय ओझे घेऊन तुम्हां सर्वांकरिता आणि तुमच्या सर्व गरजांकरिता प्रार्थना करीत असतो. आमच्याशी व्यक्तिगतरित्या जोडले गेलेले आहे त्यांची आणि प्रत्येक प्रार्थना भागीदार विश्वासातील भागीदार, वर्गणीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार अशा सर्वांच्या वैयक्तिक फाईल आणि रजिस्टर बनविलेले आहे. तुमच्याकरिता, आणि तुमच्या परिस्थितीबद्दल प्रार्थना करणे हि आमची जबाबदारी आहे असे मानून त्याकरीता  अंत:करणात ओझे घेऊन प्रार्थना करीत आहोत. मी माझ्या वैयक्तिक खोलीत प्रार्थने करीता एक "पेन्सिल प्रेअर मॅट" नांवाने विशिष्ट जागा ठेविली आहे; आणि ती मॅट (चटई) दिवसाचे २४ तास तयार असते. आपला प्रभु आमच्या प्रार्थना स्विकारुन तुम्हा सर्वांना आशीर्वाद देईल. कशाविषयी भिती बाळगु नका. देव आपल्या सोबत आहेत.  देवाच्या लेकरांना या त्रासातून आणि कठीण स्थितीना सामोरे जावे लागते, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे; तेव्हा, धीट असा. देव या नवीन वर्षात तुमच्यासाठी महान अशा गोष्टि करील. "**अगे भूमि, भिऊ नको, उल्लास कर, हर्ष कर कारण परमेश्वरानें महत्कृत्ये केली आहेत.**" (योएल २:२१)

आम्हाला काही स्वतंत्र मंडळ्या बाबत आणि सेवा संस्थांबद्दल माहिती प्राप्त झाली आहे. आम्हाला असे वाटते की, भविष्यात भारतात अशा सेवाकार्यांवर कठीण परिस्थिती उद्भवू शकते. त्यामुळे अशा देवाच्या सेवकांनी अशा समयात जे आवश्यक ते करताना काळजी घेतली पाहिजे.

तुम्ही वैयक्तीकरित्या आणि कोणत्याहि संस्थेच्या अधिकारात देवाची सेवा करीत असाल तर कोणत्यातरी मान्यताप्राप्त अशा आत्मिक संस्थेशी अधीकृतपणे जोडले जा. तुम्ही जर एखाद्या संस्थेमध्ये होता आणि काही कारणांस्तव आता वैयक्तिक रित्या सेवा करीत आहात, तर मागील सर्व कांही विसरुन परत एकवार संबंध प्रस्थापित करा. तुमच्या वरिष्ठांशी सहकार्य करा व संस्थेत तुमचे स्थान प्रस्थापित करा. तुमच्या शेजाऱ्यांशी ते कोणत्याही धर्माचे असोत त्यांच्याशी चांगले संबंध असू द्या. या ख्रिसमसच्या समयात तुम्ही स्वत: त्यांना भेटू शकता व फळे किंवा केक देऊन तुमचे प्रेम व्यक्त करु शकता. कृपया हा सल्ला स्विकारा व याविषयी निष्काळजी राहू नका.

भविष्यात, तुमच्या सेवेस देवाच्या मार्गदर्शनाची आणि मनुष्यांच्या मेहरनजरेची गरज लागणार. "**पाहा, लांडग्यांमध्ये मेंढरांस तसे मी तुम्हास पाठवितो; यास्तव तुम्ही सापांसारिखे चतुर व कबुतरांसारिखें साळसूद व्हा.**" (मत्तय १०:१६). आपल्यामध्ये कांही कार्यक्षम वकील, अकाऊटंट आणि पवित्रशास्त्र पारंगत व्यक्ति आहेत, ज्या सेवा भावनेने मदत करण्यास तयार आहेत.

तुम्ही जर इश्वरविज्ञान शास्त्र पदवीधारक नाही अहात, परंतु देवाने त्याच्या सेवेसाठी पाचारण केलेले असल्यामुळें त्याच्या सेवेत विश्वासाने पूर्णवेळ कार्यरत आहात, तर तुम्ही बायबल कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा, किंवा पत्रव्यवहाराद्वारे किंवा ऑनलाईन प्रशिक्षण घेऊन प्रमाणपत्र

**Our Ministries:** ECHO OF HIS CALL Monthly Magazines (16 languages) BIBLECOR - Postal Courses (3 languages) Online Courses Theological Correspondence Courses (2 languages) Church Planting Nehemiah Bible Colleges Gospel Printing Press Great Commission Partners St. Paul's Matriculation School Crusades Community Development

प्राप्त करुन घ्यावे. जर तुमची दिक्षा झाली नसेल तर त्वरीत ती करुन घ्या. ते प्रमाणपत्र तुम्हाला सेवेकरीता उपयोगात येईल. त्याकरीता तुम्हाला पैसे खर्च करण्याची गरज नाही. आपण सर्वजण एकत्रीतपणे कार्य करू. "**पाहा, बंधुंनी ऐक्याने एकत्र राहणे किती चांगले व मनोहर आहे!**" (स्तोत्र १३३:१).

या संबंधात तुम्हाला कोणतीही मदत हवी असल्यास, तुम्ही ई-मेल किंवा पत्राद्वारे संपर्क साधू शकता. आम्ही शक्य तितकी मदत करु. आपण एकत्र होवू या! विजयशाली होऊ या!!

देवाच्या इच्छेनुसार आम्ही नवीन वर्षात देवाच्या सेवकांना सुवार्ता प्रसाराद्वारे, बाप्तिस्मा आणि पाळकीय दिक्षा देऊन सामर्थ्यवान बनविण्याकरीता निरनिराळ्या ठीकाणी प्रवास करण्याचे इच्छित आहोत. कृपया आतापासूनच आम्हाला उत्तम आरोग्य, अनुकुल कौटुंबिक परिस्थिती आणि आर्थिक सुस्थिती असावी यासाठी प्रार्थना करणे सुरु करा.

सध्या आम्ही "**एको ऑफ हीज कॉल**" या आमच्या यूट्यूवर चॅनलवरुन दररोज पहाटे ५ वाजता आणि रविवारी सकाळी ८.३० वाजता संदेश प्रक्षेपित आहोत. तुम्ही ते पाहू शकता आणि वर्गणीभरुन माहिती मिळवू शकता.

आमच्या सेवाकार्याला कायमस्वरुपी आर्थिक आधार नाही. आपला प्रभु येशू आमचा पुरवठादार आहे. तुम्ही देखील देवाच्या इच्छेनुसार मदती करीता पुढे येऊ शकता.



**मिडीया मिनिस्ट्री**

ज्या प्रभुने मागील ५४ वर्षे आमचा हात धरुन आम्हाला चालविले तो तुम्हांला देखील विपुलपणे आशीर्वादीत करील!

**ख्रिस्त येशूमधील तुमचे दास,**
**पास्टर एस. सॅम सेलवा राज आणि ॲलेक्स सॅमसन सॅम**
(+91) 98412 71858 / 98410 71858,
E.mail : samselvaraj333@gmail.com

(पान १ वरुन)

सांगते "**मी वेल आहे, तुम्ही फाटे आहा; जो मजमध्यें राहतो आणि मी त्याजमध्ये राहतो, तो पुष्कळ फळ देतो; कारण मजपासून वेगळे असल्यास तुम्हांला काही करिता येत नाही.**" यामुळे २०२३ या नवीन वर्षात पदार्पण करुया, देवाबरोबर सहभागी झाल्या शिवाय काही देखील करु शकणार नाही, परंतु त्याच्या सह सर्व काही शक्य आहे.

आपल्यापैकी अनेकांनी रेल्वे स्टेशन आणि प्रवासी बस स्थानकास. "Less luggage, more comtort, makes travel pleasant" असा इंग्रजीतील सुचनावजा फलक पाहिला असेल. हे विधान आपल्या जगीक प्रवासासाठीच केवळ नाही तर जीवन प्रवासासाठी उद्‌बोधक-अर्थपूर्ण आहे. अनेकवेळा आपल्यासोबत असलेल्या अधीक ओझे आपले जीवन कष्टि होते आणि आपलेच केवळ नाही तर इतरांचे देखील अनेकजण अनेक वर्षांपासून त्यांनी केलेल्या चुकांचे, इजांचे, वाईट किंवा चुकीच्या निवडीचे, क्रोध, कटुत्वाचे, निराशेचे, अपयशाचे आणि पसंदीचे ओझे घेऊन वावरत आहेत. हे आपल्या सध्याच्या आणि भविष्यातील संबंधावर सारख्याच प्रमाणात नुकसान घडवू शकते. ख्रिस्त येशू मध्ये आपणास आपल्या मागील पूर्वी झालेल्या चुकांबद्दल दंडाज्ञा नाही, कारण आपण अनंतकालीक कृपेने झाकलेले आहोत. आपण वाहत असलेली कवडीमोलाची गाठोडे सोडण्याची आणि मोकळे जीवन जगण्याची शिकण्याची वेळ आहे. हे अनावश्यक ओझे आपला जीवन प्रवास त्रासदायक आणि अवजड करतो.

आपल्या सर्वांकरीता देवाकडे योजना आहे. "त्याची योजना किंवा संकल्प हिताचे आहेत, अनिष्ठाचें नाहीत; ते तुम्हांस तुमच्या भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत". (यिर्मय २९:११). आपण आपल्या आत्मिक प्रवासास देवाची आपल्या विषयीची इच्छा जाणून घेऊन सुरुवात करतो. त्यामुळे आपल्या जीवनाला दिशा प्राप्त होते आणि त्यावर लक्ष केंद्रीत करण्यास मदत होते.

प्रेषित पौलाने इफिसच्या मंडळीला आपले ओझे प्रवासात आपल्याला अडखळण ठरते असे पत्रात स्पष्टपणे नमूद केले. "**सर्व प्रकारचें कटुत्व, संताप, क्रोध, कलकलाट व अभद्र भाषण ही, अवघ्या दुष्टपणासुद्धा तुम्हांपासून दूर करण्यात येवोत; आणि तुम्ही एकमेकांबरोबर उपकारिक व कनवाळु व्हा; जशी देवानें ख्रिस्तामध्यें तुम्हाला क्षमा केली आहे तशी तुम्हीहि एकमेकांला क्षमा करा.**" (इफिस ४:३१-३२). त्याशिवाय, पौल आणखीन असे सचविती कि, प्रवासात आपल्या सोबत आवश्यक तेव्हडेच सामान (ओझे) घ्या त्यामुळे आपला प्रवास आपल्या करीता व सह प्रवाशांकरीता आरामशीर आणि सुखकारक होईल.

पौल अनावश्यक अशा ६ ओझ्यांची यादी देत आहे :-

१) कटुत्व, २) संताप, ३) क्रोध, ४) कलकलाट, ५) अभद्र भाषण-निंदा आणि ६) दुष्टपणा.

आणि प्रवासात बळकटी देणारी उपयुक्त आणि आवश्यक अशी जी ओझी घ्यावी ती म्हणजे :-

१) उपकार, २) कनवाळू आणि ३) क्षमाशील वृत्ती.

## १) कटुत्व

कटुत्व हि भावना आहे जीच्या पासून मुक्त होणे कठीण आहे. हि भावना किंवा स्वभाववृत्ति आपल्याला ज्यांनी दु:ख दिले त्याच्याशी समेट करण्यास परवानगी देत नाही. कर्करोगाप्रमाणे ती पसरते आणि आपली मन:शांती व आनंद हिरावून घेते. हे अधीक अनावश्यक ओझे आपला प्रवास त्रासदायक करते.

## २) संताप

पवित्रशास्त्राचे भाष्यकार बार्कले त्यांच्या भाष्यात म्हणतात की, संताप हा गवत जळते तसा संताप जळतो, त्याची ज्वाला त्वरीत पेट घेतात. इंग्रजी म्हण आहे "in a fit of

rage" जीचा बोलण्यात पुष्कळदा उपयोग करण्यात येतो. संताप बहुतेकदा आरडाओरड करुन व्यक्त केला जातो. कोणी चुक केली आहे अशी जाणीव होते तेव्हा संतापाचा उद्रेक होतो.

ख्रिस्ती विश्वासणारे हे काही संतापाला अपवाद नाहीत. एकदा असे झाले, जॉन रविवारी उपासनेस सहभागी होण्यासाठी मोटार चालवित होता. रस्त्यावर वहातुकीची गर्दी होती. अशा वेळी जॉनच्या मोटारी मागे असलेली व्यक्ति त्याची मोटार पुढे काढण्याकरीता एक सारखा भोंगा वाजवित होता. दाट गर्दी असल्यामुळे जॉन काही त्याला पुढे जाण्याकरीता मदत करु शकत नव्हता. तरी देखील त्या व्यक्तिने जॉनच्या पुढे जाण्यात यश मिळविले; परंतु त्याच्या मोटारीच्या बाजूने जात असताना वेग कमी करुन त्याने जॉनला अविर्वाच्य भाषेत शब्द उच्चारीले जॉनला वाईट वाटले परंतु त्याने राग आवरला जॉनने उपासना मंदिराच्या आवारात प्रवेश केला आणि त्याला तीच मोटार आवारात उभी केलेली दिसली. त्याला आश्चर्याचा धक्का बसला; जेव्हा त्याला कळले की शिव्या देणारी ती व्यक्ति जुन्या पाळकाची जागा घेणार आहे. कल्पना करा, त्या नवीन पाळकांची उपासने नंतर जॉनला भेटताना काय अवस्था झाली असेल. ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांनी त्यांची साक्ष राखण्याकरीता अशा रस्त्यावरील संतापापासून स्वत:स राखले पाहिजे.

## ३) क्रोध

क्रोध दोन भागात विभागला जाऊ शकतो. अ) सात्विक क्रोध, आणि ब) असात्विक क्रोध. येशू मंदिरात गेला असताना, त्याला प्रार्थना मंदिर '**लुटारूंची गुहा**' झालेली पाहून त्याचा क्रोध बाहेर पडला. (मत्तय २१:१३). त्याने क्रयविक्रय करणाऱ्या सर्वांस बाहेर घालवून दिले. याउलट आपण जे मनुष्य प्रकृतिचे त्या आम्हांस आमच्या भावना पापामुळे कलुषित असल्यामुळे सात्विक क्रोध व्यक्त करिता येत नाही. बायबलमध्ये सांगितल्यानुसार आम्ही पापाच्या विरोधात क्रोध केला पाहिजे. ''**अहो परमेश्वरावर, प्रीति करणाऱ्यांनो, वाईटाचा द्वेष करा...**'' (स्तोत्र ९७:१०). ''**भिती बाळगा, पाप करू नका.**'' (स्तोत्र ४:४). पौल इफिस ४:२६ त्याच शब्दात सांगतो, ''तुम्ही रागावा, परंतु पाप करुं नका...'' त्याला जोडूनच पुढे तो ताकीद देतो, ''**तुम्ही रागावला असताना सूर्य मावळूं नये; आणि सैतानाला वाव देऊं नका.**''

आपण शहाणे असू तर रागास मंद असू. याकोब १:१९-२० मध्ये सांगतो - ''**कारण मनुष्याच्या रागाने देवाच्या न्यायत्वाचें कार्य घडत नाही.**'' पौल अशा प्रकारचे अनावश्यक ओझे टाकून देण्यासाठी तीन उपाय सुचवीत आहे. प्रथमत: 'पाप करु नका.' सात्विक क्रोध व्यक्त तर करावयाचा आणि ते देखील पाप न करता, हा प्रश्न आपल्या मनात उद्भवतो. जॉन स्टॉट हे देवाचे सेवक त्यांच्या इफिस करास पत्राच्या आभ्यासाच्या मालिकेत त्याचे उत्तर असे देतात - ''आम्ही याची खात्री करुन घेतली पाहिजे की; आपण क्रोध हा दुखावलेला गर्व, द्वेष, सूड-बुद्धि, वैर-शत्रुत्व आणि बदला घेण्याचा आत्मा या सर्वापासून दूर आहे.'' दुसरा उपाय - 'आपला क्रोध सूर्य मावळण्या अगोदर शांत झाला पाहिजे.' याचा अर्थ आपल्या क्रोधाला खत-पाणी घालून तो अनेक दिवस जीवंत ठेवू नये. तिसरा - सैतानाला आपल्या जीवनावर ताबा मिळविण्याची संधी देवू नये. सैतानाला आपल्या क्रोधाचा लाभ घेऊन आपल्याला तिरस्कार करण्यास किंवा हिंसामय कृती करण्यास किंवा सहभागिता तोडण्यास प्रवृत्त करण्याची संधी देवू नये. आणखीन एक उपाय शलमोन राजा - नीतिसूत्रे १५:१. या वचनात देतो - ''**मृदु उत्तरानें कोपाचें निवारण होते; कठोर शब्दानें क्रोध उत्तेजित होतो,**'' अशा प्रकारे प्रवास सुलभ व्हावा, यासाठी क्रोधाचे जड ओझे काढून टाकावे.

## ४) कलकलाट

कलकलाट - हे झगडणे किंवा उद्धटपणे, मोठ्या आवाजात आणि अनियंत्रीत पणाने भांडणे. अनेकदा मंडळीतील पाळकीय समितीचे सभासद उपासना मंदीरात कलकलाट करताना पहावयास मिळतात. पास्टरेट कमिटी निवडणूकीच्या प्रसंगी अशा प्रकारचा कलकलाट किंवा भांडण थांबविणयकरीता पोलीसांना मधे यावे लागलेले आपण पाहिले असेल. पौल तीमथ्याला लिहिलेल्या पत्रात अध्यक्ष किंवा मंडळीची काळजी घेणाऱ्या व्यक्ति विषयी कशी असावी याविषयी लिहितो - ''**ती भांडण न करणारी, तर सौम्य, द्रव्यलोभ न धरणारी अशी असावी.**'' शलमोन राजा म्हणतो, ''**भांडखेर बायकोबरोबर प्रशस्त**

(...पान ६ वर)


# नहेम्या बाईबल कॉलेज

**निवासी आणि सायंकाळीन कॉलेज**
**वेलाचेरी आणि चेपॉक संतोषपुरम**

माध्यम : हिंदी/इंग्लीश

विद्यार्थी ATA सभासद नोंदणीस पात्र
**आंतरराष्ट्रिय ख्रिस्ती पुढाऱ्यांद्वारे आणि वरिष्ट पाळकांद्वारे ५३ वर्षांपासून मान्यता प्राप्त**

**सर्टिफिकेट इन थियॉलॉजी : कालावधी एक वर्ष**
**डिप्लोमा इन थियॉलॉजी : कालावधी दोन वर्षे**

**शैक्षणिक पात्रता : १० वी इयत्ता आणि अधिक**
**प्रवेशा करिता त्वरा करा !**

**Contact : The Chairman, Nehemiah Bible College.**
**10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA.**
**Phone : (+91-44) 2852 8282, Cell : (+91) 98410 71852 / 95661 31858**
E.mail : sam@echoofhiscall.org / Website : www.echoofhiscall.org
✲ ऑनलाईन क्लास उपलब्ध आहे ✲

GREAT COMMISSION PARTNERS
ECHO OF HIS CALL MINISTRIES SINCE 1969

# महान सेवाकार्याचे भागीदार प्रार्थना विनंत्या

ओझी वाहाणे (गलती ६:२),
गरजा भागविणे (रोम १२:१३),
आणि कार्यास गती देणे (२ तिमथी १:६)

स्तुति आणि प्रार्थनेचे मुद्दे १९ जानेवारी २०२३ ते १८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत

(कृपया हे पान बाजूला काढून, सतत प्रार्थना करण्याकरिता तुमच्या पवित्र शास्त्रात ठेवा)

## ✝ स्तुति करिता मुद्दे

**१९ जानेवारी** : आमच्या मुख्य मंडळीत आणि शाखा मंडळ्यात ख्रिस्त जन्मदीनाच्या आणि नूतन वर्षाच्या उपासना मोठ्या उत्साहाने घेणे शक्य झाले.

**२० जानेवारी** : आमच्या **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कुल, नहेम्या बायबल कॉलेज** आणि **पत्रव्यवहारा द्वारे** सुरु असलेल्या अभ्यासक्रमां बद्दल.

**२१ जानेवारी** : आमच्या मुख्य मंडळीतील पुरुषांच्या सभेवरील देवाच्या आशीर्वादा बद्दल.

**२२ जानेवारी** : आमच्या मुद्रणालयात एकूण १६ भाषेत शुभवर्तमान साहित्य छापून ते मिशन क्षेत्रात पाठविण्याकरिता तो पुरवीत असलेल्या आशीर्वादा बद्दल.

**२३ जानेवारी** : मागील महिन्यातील आमच्या सर्व आत्मिक आणि आर्थिक गरजा पुरविल्या बद्दल.

**२४ जानेवारी** : आमचे वरिष्ठ पाळक पास्टर सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना देत असलेल्या विपुल आशीर्वादा बद्दल.

**२५ जानेवारी** : आम्हाला नित्यनियमाने थियॉलॉजीकल शिबिर आयोजन करणे शक्य होऊ देत असल्या बद्दल.

**२६ जानेवारी** : आमच्या सर्व प्रार्थना भागीदार, वर्गणीदार, विश्वासातील भागीदार, आजीवन भागीदार आणि महान आज्ञापालनातील भागीदार आणि त्यांच्या कुटुंबियांकरिता.

**२७ जानेवारी** : आमच्या **नहेम्या बायबल कॉलज** च्या विद्यार्थ्यांकरीता संगीत वर्गाची उपलब्धता केल्या बद्दल.

**२८ जानेवारी** : आमच्या मंडळीत नवीन विश्वासणाऱ्याची भर घालून आशीर्वादीत केल्या बद्दल.

**२९ जानेवारी** : संस्थेला नवीन कर्मचारी वर्ग पुरवून आशीर्वादीत केल्या बद्दल.

**३० जानेवारी** : आमच्या **सेंट पॉल्स् मॅट्रीक्युलेशन स्कूल** मधील गरीब विद्यार्थ्यांना संगीत शिकण्याकरिता ''कि बोर्ड आणि 'गिटार' पुरविल्या बद्दल.

**३१ जानेवारी** : आमच्या सहसंपादकाद्वारे प्राप्त होत असलेल्या सहकाऱ्या बद्दल.

**०१ फेब्रुवारी** : नहेम्या बायबल कॉलेजच्या निवासी विद्यार्थ्यासाठी संध्याकाळी खेळण्यासाठी कॅरम बोर्ड आणि बुद्धिबळ बोर्ड खरेदी करणे शक्य होऊ दिल्या बद्दल.

## ✝ प्रार्थने करीता मुद्दे

**०२ फेब्रुवारी** : आमच्या मुख्य मंडळी आणि शाखा मंडळ्यांतील विश्वासणाऱ्यां बद्दल.

**०३ फेब्रुवारी** : देवाच्या हॉस्पीटल सेवाकार्यातील चमत्कारा बद्दल.

**०४ फेब्रुवारी** : सर्व ख्रिस्ती मंडळ्या आणि संस्थाना सुरक्षितते करीता आणि आशीर्वादा करीता.

**०५ फेब्रुवारी** : जागतिक शांतते करीता.

**०६ फेब्रुवारी** : लेकरांचे आणि स्त्रियांचे अत्याचारापासून रक्षण व्हावे.

**०७ फेब्रुवारी** : या महिन्यातील **एको ऑफ हिज कॉल** सेवा कार्याकरिता आवश्यक निधी उपलब्ध व्हावा.

**०८ फेब्रुवारी** : **एको ऑफ हिज कॉल** सेवेतील सर्व स्टाफच्या आरोग्या करीता.

**०९ फेब्रुवारी** : आपल्या देशाच्या सर्वांगीण उन्नति करीता.

**१० फेब्रुवारी** : सर्व सहसंपादक आणि त्यांच्या कुटुंबियां करीता.

**११ फेब्रुवारी** : आमच्या वरीष्ठ पाळकांना त्यांचे आत्मचरित्र लिहिण्यास हृदयाचा विशालपणा आणि मार्गदर्शन लाभावे.

**१२ फेब्रुवारी** : या महिन्यातील आमच्या सर्व गरजा पुरविल्या जाव्यात.

**१३ फेब्रुवारी** : भूतलावर त्याचे राज्य उभारण्यासाठी दिव्य दृष्टि द्यावी.

**१४ फेब्रुवारी** : भारतातील शुभवर्तमान न पोहंचलेल्या जमातीपर्यंत ते घेऊन जाणे शक्य व्हावे.

**१५ फेब्रुवारी** : आमच्या संस्थेला आणि सर्व स्टाफ व त्यांच्या कुटुंबियांना आशीर्वाद द्यावा.

**१६ फेब्रुवारी** : तरुणांकरीता आणि बाह्य सुवार्ता कार्या करीता.

**१७ फेब्रुवारी** : वरीष्ठ पाळक, पास्टर सॅम सेल्वा राज आणि त्यांच्या कुटुंबियांना उत्तम आरोग्य दान द्यावे.

**१८ फेब्रुवारी** : सर्व दारुडे आणि कुकर्म करणाऱ्यांनी पश्चाताप करावा.

(पान ४ वरुन)

**घरात राहण्यापेक्षा, धाब्याच्या एका कोपऱ्याला बसणे पुरवेल.''** (नीतिसूत्रे २१:९).

## ५) अभद्र भाषण - निंदा

अभद्र भाषण म्हणजे इतरांबद्दल वाईट बोलणे, विशेषत: त्यांच्या अनुपस्थितीत त्यांच्या विषयी बोलणे. अशा प्रकारचे बोलणे केवळ त्यांचीच प्रतिष्ठा धुळीस मिळते असे नाही तर आपली देखील. गणना १२:१ हे वचन आपणास मिर्याम आणि अहरोन यांनी मोशेने कुशी लोकांतील स्त्रीशी विवाह केल्याबद्दल त्याची निंदा करु लागले. ''... **हे त्यांचे बोलणे परमेश्वराने ऐकले.''** (गणना १२:२). परमेश्वराचा क्रोध त्याजवर भडकला आणि त्याने मिर्याम व आहरोन यां सांगितले, ''**माझा सेवक मोशे त्याची निंदा करावयास तुम्हास भीति कशी नाही वाटली?''** (गणना १२:८). परमेश्वराचा क्रोध त्यांजवर भडकला व ती बर्फासारखी पांढरी झाली. आपल्याला आपण मुखातून निघालेल्या प्रत्येक शब्दाचा हिशेब द्यावा लागणार आहे. ''**जें काही तुम्ही अंधारात बोलला ते उजेडांत ऐकण्यात येईल आणि जे तुम्ही आंतल्या कोठड्यांत कानी सांगितले असेल ते धाब्यांवर गाजविले जाईल.''** (लूक १२:३) याच कारणास्तव याकोब त्याच्या पत्राच्या ३ऱ्या अध्यायात जीभेला वश करण्याविषयी संपूर्ण अध्याय लिहित आहे. निंदा हे धोकादायक असे अनावश्यक असे ओझे आहे. ते फेकून द्या.

## ६) दुष्टपणा

दुष्टपण हे वाईट इच्छा, लोकांच्या विरोधात दुष्ट कट करणे. उत्पत्ति ३७ अध्यायात याविषयीचे अगदी योग्य उदाहरण सापडते. योसेफाच्या भावांनी त्याच्या विरुद्ध कपट कारस्थान रचले. ''**चला, आपण त्याला ठार करुन एका खड्यांत टाकून देऊ आणि मग सांगू की कोणा हिंस्त्र श्वापदानें त्याला, खाऊन टाकिले.''** (उत्पत्ति ३७:२०). परंतु देवाने वेगळेच इच्छिले, आणि योसेफाचे जीव रऊबेनमुळे वाचला. आणि कालांतराने देवानें योसेफास मिसर देशात उच्च्य पदावर नेमिले आणि त्याच्या भावांना त्याच्या समोर नमन करण्यास भाग पाडिले. अशाच प्रकारे हमानाने मर्दखायाच्या विरोधात कट रचला आणि ५० हात उंचीचा फाशी देण्याचा एक खांब उभा केला. (एस्तेर ५:१४). परंतु उपरोधीकपणे तो त्याजवरच उलटला. त्याला त्याच खांबावर फाशी देण्यात आले. (एस्तेर ७:९). **आपला जीवन प्रवास सुरळीत होण्यात अडखळ ठरणारी ओझी आपल्याला समजल्यावर आता ती ओझी फेकून कशी देता येतील त्या विषयी माहिती समजुन घेतली पाहिजे.**

**पहिली आणि प्रमुख किंवा महत्वाची पायरी** - आपण कटुत्व, संताप, क्रोध, कलकलाट, अभद्र भाषण - निंदा, दुष्टपणा या पैकी कोणते ओझे घेऊन प्रवास करीत आहोत याविषयी अंत:करण तपासून पहाणे. त्यानंतर प्रार्थनेमध्ये ते देवाकडे कबूल करुन ते काढून टाकण्यास त्याला मदत करण्याची विनंती करणे. त्याशिवाय ते ज्यावर आपला विश्वास आहे अशा मार्गदर्शकाकडे किंवा प्रार्थना - जोडीदाराकडे घेऊन जाऊ शकते. तो आपल्याला त्रासदायक भाग शोधण्यास किंवा काही चुकीने शोधण्याचे राहून गेले असेल तर त्यामध्ये मदत करु शकतील.

**दुसरी पायरी** त्यापासून मुक्त होणे. या भावनांतून मुक्त होणे अतिशय कठीण आहे; त्याकरीता आपले प्रयत्न, आपली ताकद उपयोगी पडू शकत नाही, कारण आपल्यामध्ये दोन प्रकारच्या शक्ती कार्य करीत असतात, एक ''चांगली'' आणि दुसरी ''दुष्ट'' किंवा ''वाईट''. अशा परिस्थितीत पौल आक्रोश करीत म्हणतो; ''**किती मी कष्टी मनुष्य! मला या मरणाऱ्या देहापासून कोण सोडवील?''** (रोम ७:२४) आणि पौलाला उत्तर देवामध्ये सापडते. आणि तो म्हणतो, ''**आपला प्रभु येशू ख्रिस्त याच्या द्वारे मी देवाचे उपकारस्मरण करितो.''** (रोम ७:२५). हि अनावश्यक ओझी जीवनातून काढून टाकण्यास आपणास देवाच्या सामर्थ्याची गरज आहे. देवाने आपल्याला मदतीकरिता एक सल्लागार आणि सांत्वन करणारा दिला आहे येशू, देव जो पुत्र तो आपल्याकरिता मध्यस्थि करतो, देव जो पवित्र आत्मा, तो आपला प्रार्थनेत शब्दाचा गोंधळ होतो तेव्हा आपल्या मुखात योग्य शब्द घालतो, देव जो पिता, तो आपल्या प्रार्थना ऐकतो व उत्तर देतो. या आत्मविश्वासाने आपण कृपेच्या राजासनाजवळ जाऊ शकतो आणि तो आपल्याला मुक्त करील. ''येशू ख्रिस्ताने आपणास, ''वाईटापासून सोडीव'' अशी प्रार्थना करण्यास शिकविले आहे. आपल्या जीवनातून हि अनावश्यक ओझी काढून टाकण्यास देने आपणास मदत करावी म्हणून प्रार्थना केली पाहिजे.

**तिसरी पायरी** - आपले अंत:करण विरुद्ध उपायांनी (antidote) भरावे. कोणत्या विषासाठी त्यावर उतारा असतो. पौल त्याच संदर्भात इफिस ४:३२. या वचनात सहा धोकादायक भावनां ज्या आपला प्रवास त्रासदायक आणि कंटाळवाणा करतात त्याच्या विरोधात तीन उतारे (antidote) देतो.

पौल म्हणतो ''**तुम्ही एकमेकांबरोबर उपकारीक व कनवाळू व्हा, जशी देवाने ख्रिस्तामध्ये तुम्हांला क्षमा केली तशी तुम्हीहि एकमेकांला क्षमा करा.''**

जीवन प्रवासास पुरक आणि उपयुक्त आणि आवश्यक अशी ओझी जी आपण सोबत घ्यावी ती...

## १) दयाळूपणा

दयाळूपणा हा एक सद्गुण आहे आणि तो आपल्यामध्ये असणे आवश्यक आहे; त्याद्वारे लोकांना कळते की आपणाला दुसऱ्यांची काळजी आहे; आणि त्याचा परिणाम त्यांच्या दु:खाचे निवारण होते. ''दयाळू असणे'' याचा अर्थ जे कोणी गरजवंत आहे त्यांच्या प्रती सदिच्छा प्रकट करणे दयाळूपणा हि तुलनात्मक रित्या दुबळ्या असलेल्या व्यक्तिसाठी शक्तिशाली मनुष्याच्या ठायी त्याचे काहितरी चांगले करण्याची स्वभाववृत्ती, दयाळूपणा हि देण्याची स्वभाववृत्ति आणि जाणूनबुजून देण्याची वृत्ति! ख्रिस्ताच्या मृत्यु आणि पुनरुत्थाना द्वारे आपल्याला विपुल जीवन, तारण, स्वातंत्र्य आणि देवाची विपुल अशी कृपा प्राप्त झाली. आपण स्वत:त अशक्त/दुर्बल आहोत असे वाटत असले, तरी ख्रिस्तात आपण सशक्त-बलवान आहोत. हि सशक्तता आपणांस इतरांशी दयाळू रहाण्यास मदत करते. त्याचा अर्थ आपण त्यांना क्षमा करु शकतो. क्षमा ही काही अशक्तपणाचे बाह्य प्रदर्शन नाही. तर ते दयाळूपणाचे आणि शक्तिचे प्रदर्शन आहे.

## २) कळवळा-कनवाळूपणा

खऱ्या अर्थाने कळवळा/कनवाळूपणा म्हणजे ''एकत्रीतपणे सहन करणे.'' ''कळवळा'' अशी भावना आहे, जी दु:ख सहन करीत असलेल्या दुसऱ्या व्यक्तिस त्यांतून जलद सुटका व्हावी याकरीता प्रेरित

होणे. कळवळा हा व्यक्तिच्या त्रासात आपण स्वत: असल्यासारखे वाटणे आणि त्याला मदत करण्याची इच्छा असणे. कोणी त्रासात असलेले पाहून त्यात सहभागी व्हावेसे वाटणे. उदा. आपण बसमध्ये प्रवास करीत आहोत आणि एक गर्भवती स्त्री आपल्याला उभी असलेली दिसते आपण तत्काळ उभे रहातो आणि तिला बसण्यास आपली जागा देतो. यालाच कळवळा म्हणतात. आपली दिवसभरातील निवडलेली एक छोटीशी कृति आपल्या नकारात्मक भावना समतोल राखण्यात मदत करते. हा एक उत्तम उपाय (उतारा) आहे जो अगोदरच्या अवजड ओझ्यांना प्रवासातील वेग मंदावण्यास उपयोगी ठरतो.

मार्क ६:३४ येशूने मेषपालाशिवाय असलेला लोकांचा समुदाय पाहिला आणि त्याला त्याचा कळवळा आला, पुढे ६:३७-४४ या वचनात आपण वाचतो. त्याने त्याची केवळ आत्मिकच नाही तर शारिरीक तहान आणि भूक शमविली. आब्राहामाला जेव्हा कळते की देव सदोम आणि अमोराचा संहार करणार आहे; तेव्हा त्याला त्यामधील धार्मिक लोकांबद्दल कळवळा येतो आणि तो देवाला नाश न करण्याची विनंती करु लागला. अब्राहामाने शहरात जर ५० धार्मिक असले तर देवाने शहराचा संहार करु नये येथपासून विनविण्यास सुरुवात केली. सदोम नगरात पन्नास धार्मिक आढळले तर संहार न करण्याचे मान्य केले. परंतु अब्राहामाने विनंती करण्याचे थांबिविले नाही. कारण त्याला ठाऊक होते की सदोमात ५० धार्मिक लोक नाहित. त्यामुळे तो ४५, ४०, ३५, ३० आणि शेवटी १० पर्यंत संख्या कमी करीत विनवणी करु लागला. यालाच कळवळा म्हणतात.

## ३) क्षमेचा आत्मा

स्वाभाविकात: आपल्याला इतरांना क्षमा करण्यास तयार करतात. क्षमा आपल्या सर्व संबंधाचा तळ गाठणे आहे. क्षमेचा आत्मा ख्रिस्ती विश्वासणाऱ्याचा दृष्टिकोण असावा, कारण विश्वासणारे हे क्षमा करणारे असतात. देवाने आपल्याला क्षमा केली तशी आपणहि क्षमा केली पाहिजे. आपणांस दुखविल्यास त्याचा प्रतिकार आपण कोणी कटुत्व, संताप, क्रोध, कलकलाट, निंदा आणि दुष्टपणा या द्वारे करतो. या सर्वांबद्दलची प्रतिक्रिया हि विध्वंसक स्वभावासारखी किंवा विध्वंसक शब्दांसारखी बाहेर पडते. त्या क्षणाला आपली त्वरीत प्रतिक्रिया आपले संबंध बिघडवू शकते. याची आपल्याला जाणीव होत नाही. आपल्याला ज्यांनी दुखावते त्यांना क्षमा करणे हाच एक संबंध टिकविण्याचा - अबाधीत राखण्याचा एकमेव मार्ग आहे. अशा प्रकारे संपूर्ण परिच्छेदाच्या आभ्यासाचा सारांश एकाच शब्दात करता येईल तो म्हणजे "**क्षमा**".

पौल म्हणतो देवाने आपल्या पापांची क्षमा केली तशीच आपण देखील क्षमा करावी. त्याने आपल्याला मुक्ती दिली आहे आणि क्षमा केली आहे (इफिस १:७) हि क्षमा देवाबरोबरच्या आपल्या संबंधाचा मध्य आहे. देवाने आपली पापे पुसुन टाकली, त्याचा आपल्यावरील क्रोध काढून टाकला आणि आपल्याला मृतावस्थेतून जीवंत केले. तो आपल्याशी विश्वास ठेवण्यास कठीण अशा रितीने दयाळू आणि कणवाळू राहीला. आणि आता ख्रिस्ताद्वारे आपण सुरक्षित आणि गौरवशाली भूतकाळाला सामोरे जाऊ शकतो. देवाने आपल्याला क्षमा केलेली असल्यामुळे, इतरांना क्षमा करण्यासाठी आपल्याला कारण आणि शक्ति आहे. जसा देवाने आपली पापे पुसुन टाकली आणि ख्रिस्ताद्वारे आपल्याकडे आपण पवित्र आणि निर्दोष असल्यासारखे पहातो, तसेच आपण देखील इतरांच्या बाबतीत करावे - आपल्या चुकांच्या बहितून इतरांची पापे पुसुन/खोडून टाकावी. पौल इफिस ५:१-२ या वचनात आपल्याला आग्रहाची विनंती करीत आहे, "देवाचे अनुकरण करणारे व्हा" आणि प्रीतीचे जीवन जगा, "ख्रिस्तानें तुम्हावर प्रीति केली, तद्नुसार तुम्हीही प्रीतिने चाला". आपल्याला आपल्या जीवनात देवाचें अनुकरण करता यावे यासाठी आपण क्षमेचा आत्मा ग्रहण केला पाहिजे.

क्षमा न करण्याचा स्वभाव आपला प्रवास अतिशय त्रासदायक बनवितो तो आपल्याला खाली खेचतो आणि क्वचितच पुढे जाण्यास परवानगी देतो. क्षमाशीलता हा महत्वाचा ख्रिस्ती सद्गुण आहे. आपल्याला आपल्या पापांची क्षमा आणि पापाच्या स्वाभाविक परिणामांपासून सुटका प्राप्त झाली असल्यामुळे आपल्या विरोधात इतरांनी केलेल्या दुष्टतेची आणि पापांची त्यांना क्षमा करणे आपल्याला भाग आहे. आपण क्षमा करीत नाही, तर स्वत:स विश्वासणारे म्हणवून घेण्याचा आपल्याला अधीकार नाही. मत्तय ६:१४-१५. या वचनात "**येशू ख्रिस्तानें आपणास क्षमा करण्यास शिकविलेले आहे,**" **जर तुम्ही मनुष्यांच्या अपराधांची क्षमा करिता तर तुमचा स्वर्गीय पिता तुम्हास क्षमा करील; परंतु जर तुम्ही मनुष्यांच्या अपराधांची क्षमा करणार नाही.**" आणि मार्क ११:२५. "**आणखी तुम्ही उभे राहून प्रार्थना करिता तेव्हां तुमच्या मनांत कोणाविषयी कांही असेल तर त्याची क्षमा करा; हे यासाठी की तुमच्या स्वर्गातील पित्यानें तुमच्या अपराधाची क्षमा करावी.**" या वेळी हे देखील लक्षात असू द्यावे, ते हे की, आम्ही क्षमा करतो म्हणून देव आम्हास क्षमा करतो, परंतु असे नाही, तर ती केवळ त्याच्या महान दयेमुळे. क्षमा न करण्यीच प्रवृत्ती आपल्याला सहा अनावश्यक ओझ्यांकडे नेते, ज्या विषयी आपण अगोदरच चर्चा केली आहे. क्षमा कशी करावी आणि विसरुन जाणे हे शिकणे हे आनंदी ख्रिस्ती जीवनाचे रहस्य आहे.

(पुढील पान ९ वर)


## कर सवलत

*to donations received for Educational and Medical Aid for under-privileged*

**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्टला** भारतातील कोणत्याहि एका व्यक्तिद्वारे किंवा संस्थाद्वारे देण्यात येणारी देणगी हि आयकर कायद्याच्या ८० जी कलमा अंतर्गत कर सवलतीस पात्र ठरते. कृपया आपली देणगी डी.डी./धनादेश/मनी आर्डर "**एको ऑफ हिज कॉल एज्युकेशनल ट्रस्ट**" च्या नावाने खालील तपशीलानुसार आम्हाला पाठवा

| | | |
|---|---|---|
| **Account Name** | : | **ECHO OF HIS CALL EDUCATIONAL TRUST** |
| **Account Number** | : | **1023 2923 805** |
| **Bank Name** | : | **STATE BANK OF INDIA** |
| **Branch** | : | **TRIPLICANE, CHENNAI - 600 005** |
| **IFSC Code** | : | **SBIN 0000249** |
| **SWIFT Code** | : | **SBI NIN BB 455** |



# खड्ड्यातून महालापर्यंत

## PIT TO PALACE

**''नाचणाऱ्याने हे ध्यानात आणावे !'' (मत्तय २४:१५)**

**(पास्टर एस. सॅम सेलवाराज यांच्या जीवनातील अनुभव)**

## तो माझे जीवन बदलतो

**तो गरीबांना धुळीतून उठवतो, आणि गरजूंना राखेच्या ढिगाऱ्यातून बाहेर काढतो (स्तोत्र : ११३:७)**

मी माझ्या नियमित कामाच्या तासानंतर, हस्त पत्रिका वाटणे, व्यक्तिगत सुवार्ता कार्य आणि छोट्या प्रमाणात सुवार्ता सभा आयोजीत करीत असताना देवाने मला ते परिणामकारक रित्या करण्यास मदत केली.

१९७१ साली माझ्या सोबत कार्यालयात काम करणारे माझे प्रिय मित्र बंधु डी. डब्ल्यु देवकांथन आणि बंधु आर.ई. जयराज मजजवळ आले आणि मला प्रश्न केला, ''तुम्ही या कार्यालयात एक असामान्य अशी व्यक्ति दिसता! मला तुमच्या मध्ये कांहीतरी विशेष असे दिसते!! याचे काय कारण आहे? तुम्ही ख्रिस्ती आहात कां?'' मी उत्तर दिले, ''होय, मी ख्रिस्ती आहे, मी ज्या प्रभु येशू ख्रिस्ताने स्वर्ग आणि पृथ्वी निर्माण केली आणि ज्याने मला वाचविले त्या सामर्थी देवाचे मी लेकरु आहे.'' ते मला पुन: म्हणाले, तुम्ही हुशार तरुण आहात''! तुम्ही अजुनहि तारणाच्या अनुभवात आहात कां?'' मी त्यांना 'होय' असे उत्तर दिले. त्यांनी मला मिठी मारीली आणि विचारीले, कि बंधु डी. डब्ल्यु. देवकांथन यांच्या बरोबर त्यांच्या पास्टरना भेटण्यास जाऊ शकता कां? मी रविवारी त्यांच्या सोबत जाण्याचे मान्य केले. त्यांनी रविवारी त्यांच्या सायकलवर मागे बसवून त्यांच्या अपॉस्टॉलीक ख्रिश्चन असेंबलीच्या वरिष्ठ पास्टर जी. सुंदरम आणि सहाय्यक पास्टर एम्. के. सॅम सुंदरम यांची भेट करून दिली. हि डिसेंबर १९७१ ची गोष्ट.



**बंधु डी. डब्ल्यु देवकांथन**

त्या दिवशी वरिष्ठ पाळक पास्टर जी. सुंदरम यांच्या बरोबर संभाषण झाले ते कदापी न विसरण्या सारखे आहे. त्यांचे सुंदर व्यक्तिमत्व, हास्य, काळजी व्यक्त करणारे शब्द आणि जबाबदारीनी मला माझ्या



**वरिष्ठ पास्टर जी. सुंदरम**



**सहाय्यक पास्टर एम्. के. सॅम सुंदरम**

वडीलांबरोबर असलेल्या संबंधाची आठवण झाली. त्यामुळे मी त्यांना म्हटले, माझी देखील तुमच्या सारखे परिवर्तीत होण्याची इच्छा आहे''! त्यांनी देखील मला मिठी मारीली व माझे चुंबन घेऊन मला म्हटले, ''ते उदीष्ठ गाठण्यासाठी तुम्हाला फार मोठी किंमत चुकवावी लागेल व जीवनात कठीण अशा परिस्थितीतून जावे लागेल.'' मी उत्तर दिले, मी ते अगदि मन:पूर्वक करीन''. त्या दिवसापासून मी त्यांच्या मंडळीचा एक भक्कम असा सभासद बनलो. मला सेवाकार्य गटा मध्ये सामावून घेण्यात आले. त्यांच्या मंडळीतील संदेशांनी आणि कार्यक्रमांनी मला आकर्षित केले.

सहाय्यक पाळक एम्.के. सॅम सुंदरम यांच्या सोबत देखील साधेपणाने सेवा कार्यात माझा उपयोग करुन घेतला गेला. त्यांनी देखील मला शिकविले व स्थिर केले.


त्या मंडळीतील बंधु व्हिक्टर स्वामीदास (रेल्वे), बंधु डो. सेल्वाराज (पी.डब्ल्यू.डी.), सुवार्तिक जयामोहन (शिक्षक) सुवार्तिक एन्. जीवानंदम या सर्व देवाच्या सेवकांची ओळख झाली. त्या सर्वांनी मला आत्मिक जीवनात वाढण्यास मदत केली.



**बंधु व्हिक्टर स्वामीदास**

माझा पास्टर जी. सुंदरम यांच्या द्वारे २६ डिसेंबर १९७७ रोजी बाप्तिस्मा झाला आणि पास्टर एम्.के. सुंदरम आणि पास्टर रूबेन टिमे, दक्षिण आफ्रिका यांच्या उपस्थितीत सेवक म्हणून दिक्षा झाली.

पास्टर जी. सुंदरम यांनी मला पास्टर आनंद यांच्याशी जोडले, जे उपासनेला हजर रहाणाऱ्या लोकांच्या जोड्यांची, चपलांची काळजी घेत असत.



**पाळक सॅम सेल्वा राज समन्वय - १९७७**

उपासनेला हजर रहाणारे लोक आपल्या चपला, जोडे उपासना मंदिराच्या बाहेर ठेवण्यात आलेल्या लाकडी स्टॅण्ड मध्ये ठेवितात आणि उपासना संपल्यावर घेऊन जातात आम्हा दोघांवर ती







पाळक एस. आनंद

जबाबदारी सोपवण्यात आली होती.

पास्टर आनंद हे अपॉस्टॉलीक चर्च असेंबली या मोठ्या मंडळीचे मोठे आत्मिक पुढारी होते. आता ती मंडळी चेन्नाई मध्य करुणानिधी कलाईनगर नगर मिनिस्ट्री नावानें ओळखली जाते. ते माझ्या मंडळीत आणि नहेम्या बायबल कॉलेजमध्ये पाहूणे वक्ते म्हणून येऊन संदेश देतात. त्यांनी मला सेवेमध्ये विविध प्रकारे मदत केली. मी एका छोट्या मंडळीचा पाळक होतो आणि देवाने मला बायबल कॉलेज सुरु करण्या इतपत उंचावले आणि इतर महान सेवकांचा उपयोग करुन घेण्याची संधी दिली. ही एक नमुद करण्यासारखी महत्वाची बाब आहे.

अगोदर नमुद केल्या नुसार देवाने मला विविध भाषांमध्ये **एको ऑफ हिज कॉल** नावाचे मासिक चालविण्यास मदत केली. मला देवाच्या सेवेसाठी दीक्षा दिल्या नंतर लगेचच देवाने काही स्थानिक मंडळ्यांना मदत करण्यास आणि चेन्नई मधील चेपॉक या ठिकाणी उपासना सुरु करण्यास अश्यक्य असलेल्या विभागात मंडळी सुरु करणे शक्य होऊ दिले. सध्या याच ठिकाणी आमची मुख्य मंडळी आहे.

मी अतिशय श्रम करीत होतो आणि आग्रहाने प्रार्थना करीत होतो तरी देखील मला नवीन आत्मे मिळत नव्हते. मी दुसऱ्या मंडळीतील सभासदांना आकर्षित करुन माझ्या मंडळीचे सभासद करुन घेणार नाही याविषयी मी ठाम होतो. मी नेहमीच ''मेंढरे चोरण्याच्या'' विरोधात आहे. त्यामुळे केवळ माझी पत्नी आणि मुलगी पहिली पाच वर्षे माझ्या मंडळीचे सभासद होते. मी दर रविवारी सकाळी आणि संध्याकाळी अकबर साहिब स्ट्रीट वरील उपासना मंदीरात त्यांच्या समोर उभे राहून त्यांना संदेश देत असे व त्या दोघी ऐकत असत. आम्ही रस्त्यावर देखील सुवार्ता संदेश देत होतो, आणि दवाखान्यात जाऊन आजारी लोकांच्या भेटी घेत होतो. आम्ही कुटुंब या नात्याने आमची मिळकत सेवा कार्यात खर्च करीत होतो, आणि त्यामुळे काही वेळा उपाशी रहावे लागत असे.





मला ॲकॉर्डीयन हे वाद्य वाजविण्याची आवड होती; इमारतीमधील लोकांना आमचे गाणे गाणे, त्यांना आवडत नसे, त्यांचे म्हणणे होते तुमच्या गाणे गाण्यामुळे ॲकॉर्डीयन वाजविल्यामुळे आमचे देव अकार्यक्षम होतात. त्यामुळे इमारतीच्या मालकाने आम्हाला वेळोवेळी आमचे घर आणि उपासनेची जागा सोडून दुसरीकडे जाण्यासाठी जबरदस्ती करीत असत.



* * *

पान ७ वरुन

**'चवथी पायरी'** - आपण आपल्या विश्वासाचा उत्पादक व पूर्ण करणारा येशू यांजकडे पाहात जीवन प्रवास सुरु ठेवावा. इब्री १२:१. हे वचन आपल्याला उत्तेजन देते ''**तर मग आपण आपल्या इतक्या साक्षीरुपी मेघाने वेढिलेले आहे म्हणून आपणहि सर्व दडपण व सहज गुंतविणारे पाप टाकून आपल्याला नेमून दिलेल्या धावेवरुन धीराने धावावे.**''

आपण जर येशूवर लक्ष केंद्रित केले तर अतिशय सहजपणे आपल्याला शर्यत जिंकता येईल. शर्यतीत धावणारा धावपटु अंगावर कमीत कमी वस्त्र परिधान करीत असतो. पूर्ण सूट (शर्ट, पॅन्ट, कोट) परिधान केलेला धावपटू पहावयास मिळणार नाही. अशा प्रकारचा पोशाखाचा त्याच्या धावण्याच्या गतीस बाधा ठरेल, आणि तो शर्यतीचा शेवट गाठू शकणार नाही. इब्री यांस पत्राचा लेखक आपणास सल्ला देत आहे की आपण कटूत्व, संताप, क्रोध, भांडण, निंदा आणि दुष्टपणा - या **पातकांचे ओझे** बाजूला सारावे. आणि दयाळूपणा, कणवाळू आणि क्षमाशील प्रवृत्ती हे घ्यावे. जुन्या करारातील थोर पुरुषाप्रमाणे आपल्याकरीता आधुनिक युगातील साधु सुंदरसिंग, झेगेनबलग, पंडिता रमाबाई, विल्यम केरी, बिशप व्ही. एस., अझराया आणि ग्रॅहम स्टेन्स थोर आदर्श पिल्या समोर आहेत. या सर्वांनी विश्वासाने धांवले, आपल्या मातृदेशात सेवा केली आपण जे भारतीय आहोत त्या आपणा करीता मृत्यु पावले.

आपण संदेशाची सुरुवात २०२३च्या निश्चयाने केली. आता हि त्रासदायक ओझी टाकून देऊन ख्रिस्ती जीवनाचा प्रवास विजयोस्तवाने पूर्ण करुन शेवटी पौलाप्रमाणे धैर्याने जाहिर करुया, ''मी धाव संपविली आहे, विश्वास राखिला आहे... मजसाठी


## पाहिजेत

**आम्हाला उत्तम समर्पित वृत्ती आणि दिव्य दृष्टी असलेल्या कर्मचारी वर्गाची आवश्यकता आहे.**

- संगणकाचे ज्ञान असलेला कार्यालयीन कर्मचारी वर्ग.
- कार्यालय व मृदणशलयाकरीता सहाय्यक कर्मचारी वर्ग.
- कार्यालयीन देखभाल करणारा पर्यवेक्षक.
- सहाय्यक पाळक
- सुवार्तिक
- बायबल कॉलेज करीता (प्रशासकीय) प्रिन्सिपल.
- सुरक्षा रक्षक
- वाहन चालक

**संपर्क : एको ऑफ हीज कॉल ९८४७१८५८१०**

RNI NO. 70106/98, Postal Regn. No. TN/CH/(C)/206/21-23 WPP NO. TN/PMG(CCR)/WPP-261/21-23

नीतिमत्वाचा मुगूट ठेविला आहे. ते त्या दिवशी केवळ मलाच नव्हे, तर त्याचे प्रकट होणे ज्यांस प्रिय झाले आहे त्या सर्वासहि देईल (२ तिमथी ४:७-८)

नवीन वर्षाच्या या निच्छयावर विचार करा, प्रार्थना करा आणि तुमच्या जीवनाला लागू करुन थोडके ओझे घेऊन प्रवास करा. तुम्हां सर्वांना २०२३ नवीन वर्ष आशीर्वादाचे जावो हिच शुभेच्छा व्यक्त करीतो. देवाचा आशीर्वाद.

* * * * * * * **

## OUR BANK DETAILS:

### *1. Bank : State Bank of India*

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **S. Sam Selva Raj**
A/C No. : **1023 2934 679**
IFSC : **SBIN 00 00 249**
SWIFT CODE : **SBI NIN BB 455**

### *2. Bank : ICICI Bank*

Branch : **Anna Salai, Chennai-6**
Name : **Echo of His Call**
A/C No. : **6038 0502 2319**
IFSC : **ICIC 000 6038**

### *3. Bank : State Bank of India*

**(This Account is for Tax Exemption for Indians only )**

Branch : **Triplicane, Chennai-5**
Name : **Echo of His Call Educational Trust**
A/C No. : **1023 2923 805**
IFSC : **SBIN 00 00 249**

**Google Pay: 98410 71858**
**PayPal : SAM SELVA RAJ**
*****
**E.mail : sam@echoofhiscall.org**

# ECHO OF HIS CALL

१७ भाषेत मासिक, बायबल कॉलेज पत्रव्यवहाराद्वारे अभ्यासक्रम मंडळी रोपन कार्य. गावात इंग्रजी माध्यम शाळा, शुभवर्तमान साहित्य मुद्रणालय, महासभा, शिबीर, सामाजिक सेवा इत्यादि.

**वार्षिक वर्गणी : रूपये १००/-  आजीवन वर्गणी : रूपये २०००/-**

एको ऑफ हिज कॉल मिनिस्ट्रीजची विविध सेवा कार्ये तुमच्यासारख्या स्वेच्छा दान आणि देणग्या देणाऱ्या देवाच्या लेकरांनी दिलेल्या आधाराद्वारे करण्यात येतात. या सेवाकार्याकरिता देव तुम्हाला सुचवेल तशा प्रकारे तुम्ही आधार देवू शकता. शुभवर्तमान न पोहंचलेल्या लोकांपर्यंत ते नेण्याकरिता व मंडळ्या रोपन कार्याकरिता आम्हांला तुमच्या मदतीची गरज आहे.

एको ऑफ हिज कॉल मासिक तुम्हांला नित्य नियमाने मिळावे अशी तुमची इच्छा असेल तर कृपया आम्हाला लिहून कळवा. तुमचा पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता बदलला असेल तर कृपया जुना व नवा पत्ता आम्हांला कळवा.

आमच्या वेब साईटवर देखील १७ भाषेतील मासिक उपलब्ध आहे. तुम्ही साईट वर जाऊन ते वाचू सकता व डाऊन लोड देखील करून आशीर्वादित होऊ शकता.

Your letters, prayer requests and your financial helps **(Money Orders, Cheques or Demand Drafts, NEFT, PayPal (Sam Selva Raj, sam@echoofhiscall.org) PhonePe (98410 71858), Gpay (98410 71858), Western Union, MoneyGram, etc.)** to **ECHO OF HIS CALL** may please be sent to the address below.

आम्हांला आमची यादि अद्यावत करण्याकरिता कृपया तुमचा घरचा फोन मोबाईल फोन क्रमांक आणि ई.मेल कळवा.

Our address :

**ECHO OF HIS CALL**
10, MOHAMMED ABDULLAH 2ND STREET, CHEPAUK, CHENNAI - 600 005, INDIA
PH: (+91-44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766/ Cell: (+91) 98410 71852, 95661 31858 / E.mails: sam@echoofhiscall.org / biblecor@yahoo.co.in
Websites: www.echoofhiscall.org / www.stpaulsmatriculation.com

**YOU CAN SEND YOUR DONATIONS BY ONLINE ALSO**

RNI NO. 70106/98
**Postal Regn. No. :TN/CH/(C)/206/21-23**
**WPP NO. TN/PMG(CCR)/ WPP- 261/21-23**
**Date of Publication: Second week of every month**
**Date of Posting : 11th & 12th of every month**
**Posted at "Egmore RMS / 1 Patrika Channel"**
**on 12th JANUARY 2023**
**If un-delivered please return to:**
**ECHO OF HIS CALL (MARATHI)**
**P.O. Box No. 2957,**
**Chepauk, Chennai - 600 005, INDIA.**
**Phone: (+ 91- 44) 2852 8282, 2852 9293, 2854 7766**

***JESUS LOVES YOU!***

**To**

*GOD BLESS YOU!*

Owned and published by **S. Sam Selva Raj** from New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005 and printed by **S. Sam Selva Raj** at **Echo of His Call Printers,** New No. 8 & 10, Old No.18 & 19, Mohammed Abdullah 2nd Street, Chepauk, Chennai-600 005. Editor: **S. Sam Selva Raj.**